नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे | Year - 4rd | अंक - १७ | Issue - 17 | वार - गुरुवार दि. ११ जून २०२६ | Blow- Thursday Date 11 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## जनसेवा हीच साधना : पंतप्रधान मोदी

### पंतप्रधान बनण्याचा ऐतिहासिक टप्पा गाठल्यानिमित्त आयोजित एनडीए नेत्यांची बैठक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : ''माझ्यासाठी जनता हीच देवाचे रूप आहे आणि म्हणूनच मी या सेवेकडे नेहमीच एक 'साधना' म्हणून पाहिले आहे. आपण कधीही या टप्प्यापर्यंत पोहोचू असा विचार केला नव्हता आणि सलग सर्वाधिक काळ पंतप्रधान म्हणून सेवा करण्याची संधी मिळणे हे मी माझे परम भाग्य समजतो'', असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी केले. भारताचे सर्वाधिक काळ सलग कार्यरत असणारे लोकनिर्वाचित पंतप्रधान बनण्याचा ऐतिहासिक टप्पा गाठल्यानिमित्त आयोजित एनडीए नेत्यांच्या बैठकीत ते बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले, तुम्ही सर्वांनी आजचा दिवस माझ्यासाठी खरोखरच संस्मरणीय बनवला आहे. मी अत्यंत भारावून गेलो आहे आणि तुम्हा सर्वांचा मनापासून आभारी आहे. 'चरैवेती, चरैवेती' (सतत पुढे चालत राहा) या मंत्राचा जप करत आणि या राजकीय प्रवासात अनेक चढ-उतार पाहत, आपण कधी या टप्प्यापर्यंत पोहोचू असा विचारही मी केला नव्हता. भारतमातेची इतका मोठा काळ सेवा करण्याची संधी मिळणे, हे केवळ ईश्वराच्या विशेष कृपेमुळेच शक्य आहे. माझ्यासाठी जनता हीच देवाचे रूप आहे आणि म्हणूनच मी या सेवेकडे नेहमीच एक 'साधना' म्हणून पाहिले आहे. ही साधना कधीही एकाकी नव्हती; हा एक सामूहिक 'यज्ञ' आहे, ज्यामध्ये तुम्ही सर्वांनी आणि इतर अनेक सहकाऱ्यांनी कर्तव्य भावनेने आपले योगदान दिले आहे.

यावेळी लोकांना गरिबीतून बाहेर काढण्यासाठी त्यांच्या सरकारने केलेल्या प्रयत्नांचाही उल्लेख पंतप्रधान मोदी यांनी केला. ते म्हणाले, माझा असा विश्वास आहे, कि जे कालपर्यंत गरीब होते आणि आता 'नव-मध्यमवर्ग' बनले आहेत, त्यांना आपण पुन्हा मागे पडू देता कामा नये. म्हणूनच, सरकार आणि लोकप्रतिनिधी म्हणून आपण दिवस-रात्र काम केले पाहिजे. १४० कोटी जनतेने आपल्यावर ठेवलेल्या विश्वासाला आणि अपेक्षांना पूर्ण करण्याच्या संकल्पाने आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. आपल्याला भारतातील तरुण, महिला, मध्यमवर्ग आणि शेतकऱ्यांच्या आकांक्षा पूर्ण करायच्या आहेत. दरम्यान, केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी एक ठराव मंजूर केला. यामध्ये देशातील सर्वाधिक काळ सेवा करणारे निर्वाचित पंतप्रधान बनल्याबद्दल पंतप्रधान मोदींचे कौतुक करण्यात आले असून, हा दिवस भारतीय लोकशाहीच्या प्रवासातील एक ऐतिहासिक टप्पा असल्याचे म्हटले आहे. ४,३९९ दिवस सलग निर्वाचित पंतप्रधान म्हणून सेवा करण्याचा विक्रम प्रस्थापित करत त्यांनी भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचा विक्रम मागे टाकला आहे. नेहरू यांनी १९५२ ते १९६४ या काळात सलग ४,३९८ दिवस निर्वाचित पंतप्रधान म्हणून सेवा केली होती. या ठरावात नमूद करण्यात आले आहे की, हा प्रसंग भारताची लोकशाही जाणीव, जनविश्वास आणि लोकसहभागाच्या शक्तीचे प्रतीक आहे, जे 'राष्ट्र प्रथम' या संकल्पाने प्रेरित असलेल्या नेत्याला जनतेने दिलेल्या अभूतपूर्व पाठिंब्याचे दर्शन घडवते.

## विदर्भातील शाळा ३० जून रोजीच सुरु होणार, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा निर्णय, शिक्षण विभागालाही सुनावले



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने शिक्षण विभागाचा यापूर्वीचा २८ मार्च आणि ९ जून चा आदेश रद्द केला आहे. त्यामुळं आता विदर्भातील शाळा ३० जून रोजीच सुरु होणार आहेत. शिक्षण विभागाने २८ मार्च रोजी आदेश काढत महाराष्ट्रातील विदर्भासह सर्व शाळा १५ जून रोजी सुरु होतील असे निर्देश दिले होते. त्यासंदर्भात विदर्भातील शिक्षक संघटना आणि पालकांनी १५ जून रोजी तापमान म्हणावं तेवढं कमी होत नाही अशी ओरड केली होती. आधीपासूनच विदर्भातील शाळांसाठी २६ जून ची तारीख निश्चित असल्यामुळे शिक्षण विभागाच्या २८ मार्च चे आदेशाला विरोध दर्शविला होता. यासंदर्भात काही संघटना मुंबई उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठातही गेल्या होत्या.

दरम्यान, काल म्हणजेच ९ जून रोजी शिक्षण विभागाने सुधारित आदेश काढत विदर्भातील शाळा १५ जून रोजी २२ जून पासून सुरू होतील आणि २२ जून ते ३० जून दरम्यान सकाळच्या १७ शाळा भरवल्या जातील असे सुधारित आदेश काढले होते. मात्र आज नागपूर खंडपीठात सुनावणी झाल्यानंतर खंडपीठाने शिक्षण विभागाला चांगलेच सुनावले आणि विदर्भातील शाळा संदर्भात आधीच २६ जून ची तारीख निश्चित असताना नवनवीन आदेश काढून गोंधळ का वाढवला जातो असे खडसावले. आता नागपूर खंडपीठाने विदर्भातील शाळांसाठी ३० जून ची तारीख निश्चित केली आहे. शिक्षण विभाग आणि त्यांचे अधिकाऱ्यांनी शाळांच्या सुरू होण्यासंदर्भात यापूर्वीच्या जीआर च्या विरोधात जाऊन कृती करू नये असेही बजावले आहे. विदर्भाचे तापमान विचारात घेता उन्हाळ्याच्या सुट्टी व नियमित शाळा सुरू करण्याबाबत बदल करण्यात आला आहे. तापमानाचा संभाव्य धोका विचारात घेऊन विदर्भात दि. ३० जून २०२६ दरम्यान विदर्भातील सर्व शाळा सकाळच्या सत्रात भरतील. त्यानंतर १ जुलै २०२६ पासून शाळा नियमित वेळेत भरतील, असे कळविण्यात आले आहे. सदरचे परिपत्रक माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर आणि प्राथमिक शिक्षण संचालक डॉ. शरद गोसावी यांनी काढले आहे. विदर्भात मान्सून पोहोचण्यासाठी आणखी काही दिवसांचा अवधी शिल्लक आहे. परिणामी विदर्भातील तापमान विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्यादृष्टीने योग्य नसल्याचे निदर्शनास येत आहे.

## अवकाळी पावसाने बाधित फळपिकांचे पंचनामे पूर्ण करा, कृषिमंत्र्यांचे निर्देश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : 'राज्यात मे आणि जून २०२६ या कालावधीत अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि गारपिटीमुळे बाधित झालेल्या फळपिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने आणि काटेकोरपणे पूर्ण करण्यात यावेत. संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घेऊन नुकसानभरपाईची प्रक्रिया अधिक गतिमान करावी', असे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी बुधवारी दिले आहेत. मंत्रालयातील दालनात आयोजित फळपीक नुकसान आढावा बैठकीत ते बोलत होते.

बैठकीला पाणीपुरवठा मंत्री तथा जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले (व्ही.सी.द्वारे), आमदार चंद्रकात पाटील, आमदार अमोल जावळे, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सूरज मांढरे (व्ही.सी.द्वारे) आणि भारतीय कृषी विमा कंपनीचे मुख्य प्रबंधक अजित कुमार यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मे आणि जून २०२६ मधील नैसर्गिक आपत्तीमुळे राज्यातील २७ जिल्ह्यांमध्ये एकूण ६१ हजार ४ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. यामध्ये सर्वाधिक फटका केळी पिकाला बसला असून, तब्बल १८ हजार १२१ हेक्टर क्षेत्र केळीच्या पिकाखालील आहे. क्षेत्रीय स्तरावर सर्वेक्षण आणि पंचनाम्यांची प्रक्रिया सुरू असून, ६ जून रोजी झालेल्या तीव्र पावसामुळे झालेल्या नुकसानीचे अचूक मूल्यमापन करण्याचे निर्देश देण्यात आले. जिल्हानिहाय आढावा घेतला असता जळगाव, बुलडाणा, सोलापूर, पुणे, अकोला आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये फळपिकांची मोठी हानी झाली. विशेषतः जळगाव जिल्ह्यात ७ हजार ५९४ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून, त्यापैकी ७ हजार २१६ हेक्टर क्षेत्र हे एकट्या केळीचे आहे. या पार्श्वभूमीवर, भारतीय कृषी विमा कंपनीकडून सर्वेक्षण सुरू असून पुढील १० दिवसांत सर्व पंचनामे पूर्ण करण्याचे आदेश कृषिमंत्र्यांनी दिले आहे. तसेच, ४ जून आणि त्यानंतर झालेल्या नुकसानीचे पंचनामे विमा कंपनीने काटेकोरपणे करावेत. यात विमाधारक आणि विमा नसलेल्या (विमाविहीन) अशा दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांच्या नुकसानीची अचूक नोंद घेतली जाईल. आवश्यकतेनुसार सर्वेक्षणासाठी ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले.




## नौदलाला मिळणार प्रगत जीएनएसएस जॅमर, संरक्षण मंत्रालयाकडून ४४९ कोटी रुपयांचा करार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय नौदलासाठी २० 'एन्हान्सड कॅपेबिलिटी ग्लोबल नॅव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टीम' जॅमर्स खरेदी करण्यासाठी संरक्षण मंत्रालयाने बुधवारी बंगळुरू येथील 'अकॉर्ड सॉफ्टवेअर अँड सिस्टीम्स प्रायव्हेट लिमिटेड' या संस्थेसोबत ४४९ कोटी रुपयांच्या करारावर स्वाक्षरी केली. 'आत्मनिर्भर भारत' उपक्रमांतर्गत स्वदेशी संरक्षण क्षमता बळकट करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. हा करार 'बाय (इंडियन-इंडिजिनसली डिझाइंड, डेव्हलप्ड अँड मॅन्युफॅक्चर्ड )' म्हणजेच 'भारतीय बनावटीची रचना, विकास आणि उत्पादन' या श्रेणींतर्गत करण्यात आला आहे. राजधानी नवी दिल्ली येथे संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांच्या उपस्थितीत या करारावर स्वाक्षरी झाली. या प्रकल्पामध्ये किमान ७५ टक्के स्वदेशी घटकांचा वापर केला जाणार असून, यामुळे संरक्षण क्षेत्रातील सरकारच्या 'मेक इन इंडिया' संकल्पनेला अधिक गती मिळणार आहे.

तंत्रज्ञान आणि वैशिष्ट्ये संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, हे ईसीजीएनएसएस जॅमर्स शत्रूच्या 'ग्लोबल नॅव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टीम' रिसीव्हर्सची उपग्रह सिग्नल मिळवण्याची आणि त्यांचा माग ठेवण्याची क्षमता कमकुवत करण्यासाठी विकसित करण्यात आले आहेत.

शत्रूला दिशाभूल करणारे खोटे सिग्नल पाठवणे, शत्रूच्या नेव्हिगेशन (दळणवळण) आणि लक्ष्य भेदणाऱ्या (टारगेटिंग) यंत्रणेला चकवा देऊन स्वतःचे रक्षण करणे ही या या प्रणालीची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

नौदलासाठी महत्त्व प्रगत जॅमर्सच्या समावेशामुळे भारतीय नौदलाच्या युद्धनौकांना आव्हानात्मक आणि बहु-धोकादायक सागरी वातावरणात कार्यरत असताना अधिक सुरक्षा व संरक्षण लाभेल. हे तंत्रज्ञान नौदलाची इलेक्ट्रॉनिक युद्ध क्षमता बळकट करेल आणि समुद्रातील बदलत्या तांत्रिक आव्हानांना तोंड देण्याची क्षमता वाढवेल. हा करार परदेशी संरक्षण उपकरणांवरील अवलंबित्व कमी करून, स्वदेशी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सशस्त्र दलांचे आधुनिकीकरण करण्याच्या सुरू असलेल्या प्रयत्नांमधील एक मैलाचा दगड आहे, असे संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे. या खरेदीमुळे देशांतर्गत प्रगत लष्करी तंत्रज्ञानाचा विकास होऊन भारतातील संरक्षण उत्पादन परिसंस्थेच्या वाढीला चालना मिळेल, तसेच भारताची सागरी सुरक्षा यंत्रणा अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# गगनचुंबी टॉवर व झोपडपट्टीसाठी आता स्वतंत्र रेडी रेकनर

## महसूल मंत्री बावनकुळे यांची घोषणा; मुंबईत 'मायक्रो झोनिंग' सर्वेक्षण सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : एकाच परिसरात गगनचुंबी टॉवर आणि झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या नागरिकांसाठी एकच दर न ठेवता आता वेगवेगळा रेड रेकनर दर आकारला जाणार आहे. परिसरातील उपलब्ध सुविधांनुसार रेडीरेकनरदरांचे वर्गीकरण करण्यात येणार आहे. यासाठी मुंबई शहरात 'मायक्रो झोनिंग'साठी महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग अँप्लीकेशन सेंटर या सर्वेक्षण संस्थेची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकीर्दीच्या तपपूर्तीनिमित्त बावनकुळे यांनी हा निर्णय जाहीर केला. विशेष म्हणजे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरुन राज्यात तीन टप्प्यामध्ये मायक्रो झोनिंगसाठी सर्वेक्षण मोहीम हाती घेण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या सुचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधान परिषदेत मांडलेल्या 'महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) शासकीय विधेयक क्र. ९' च्या अनुषंगाने बुधवारी मंत्रालयात बैठक पार पडली. सर्वसामान्य नागरिकांना रेडी रेकनर दरामध्ये दिलासा देणारा या महत्त्वाकांक्षी निर्णयाची अंमलबजावणी सर्वेक्षणानंतर म्हणजे, पुढील आर्थिक वर्षापासून होईल, अशी तयारी महसूल विभाग करत आहे. त्यानंतर दोन वर्षांत राज्यातील महानगरांमध्ये हा निर्णय लागू होईल, असे यावेळी सांगण्यात आले.



मुंबई शहराचा सिटी सर्व्हे नंबर आणि तिथल्या विकासाचे स्वरूप विचारात घेऊन सन २०२७-२८ चा वार्षिक मूल्यदर तक्ता तयार करताना 'मायक्रो झोनिंग' मुंबईत केले जाणार आहे. आतापर्यंत एकाच भागात असलेल्या झोपडपट्टचा/ चाळी आणि मोठ्या सोसायट्यांना समान दराचा फटका बसायचा. नवीन सुसूत्रतेमुळे उपलब्ध सोयी-सुविधांनुसार योग्य आणि वास्तववादी दर ठरवले जातील. संपूर्ण महाराष्ट्र राज्यात नागरी, ग्रामीण आणि प्रभाव क्षेत्राचा अचूक डेटा गोळा करण्यासाठी एमआरसॅक मार्फत 'जीआयएस आधारित' नकाशे तयार करण्यात येणार आहेत. राज्याच्या नोंदणी महानिरीक्षकांकडून दरवर्षी मालमत्ता नोंदणीसाठी वार्षिक मूल्यदर प्रसिद्ध केले जातात. आगामी काळात राज्यातील रेडी रेकनरच्या दरांमध्ये मोठी पारदर्शकता येईल, तसेच मुंबईसारख्या महानगरात सर्वसामान्य, मध्यमवर्गीयांना आणि झोपडपट्टीधारकांना मालमत्ता व्यवहारात मोठा दिलासा मिळणार आहे. मुंबईनंतर संपूर्ण राज्यात पुढील दोन टप्प्यात मायक्रो झोनिंग केले जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या सूचनेवरून हा निर्णय घेतला.


# नव भारताच्या निर्मितीमध्ये पंतप्रधान मोदींचे स्थान अढळ : मुख्यमंत्री फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पंडित नेहरू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळाची तुलना केल्यानंतर राजकीय वर्तुळात सुरू झालेल्या वादावर मुख्यमंत्र्यांनी ही सडेतोड प्रतिक्रिया दिली. नव्या भारताच्या निर्मितीमध्ये पंतप्रधान मोदींचे स्थान अढळ असून, त्यांची कोणाशीही तुलना करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असेही त्यांनी या वेळी स्पष्ट केले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या २७ व्या वर्धापनदिनी शरद पवार यांनी काँग्रेस आणि नेहरू-गांधी घराण्याच्या देशासाठीच्या योगदानाचा उल्लेख करत नेहरू आणि मोदी यांची तुलना होऊ शकत नसल्याचे म्हटले होते. यावर नवी दिल्लीत माध्यम प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना फडणवीस यांनी पवारांचे संपूर्ण भाषण ऐकले नसल्याचे सांगत अर्धवट गोष्टींवर बोलणे टाळले; परंतु नेहरूंबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या स्पर्धेचा त्यांनी समाचार घेतला.

फडणवीस म्हणाले, देशात सर्वाधिक काळ सेवा बजावणाऱ्या निर्वाचित पंतप्रधानांमध्ये पंडित नेहरूंचा ४ हजार ३९८ दिवसांचा एक रेकॉर्ड होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आता ४ हजार ३९९ दिवस पूर्ण केले असून हा कार्यकाळ पुढेही सुरू राहणार आहे.



हा निव्वळ अधिकृत नोंदींचा भाग आहे. नेहरूंच्या काळात काय झाले आणि मोदींच्या काळात काय घडले, हे देशाला ठाऊक आहे. त्यामुळे इथे स्पर्धेचा किंवा तुलनेचा विषयच नाही, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी मोदींच्या नेतृत्वाचा आलेख उंचावत असल्याचे आकडेवारीसह स्पष्ट केले.

'बुडत्याला काडीचा आधार' काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या 'मोदी सरकार एक वर्षही टिकणार नाही' या विधानाचा समाचार घेताना मुख्यमंत्री म्हणाले, हे म्हणजे बुडत्याला काडीचा आधार मिळण्यासारखे आहे. स्वतःच्या मनाची समजूत घालण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना खोटे स्वप्न दाखवण्यासाठी ते गेली १० वर्षे अशा 'चमत्काराची' भाषा करत आहेत. मात्र, प्रत्यक्षात मोदीजीच नवनवीन राजकीय चमत्कार घडवत असून, पश्चिम बंगालमधील भाजपचा विजय संपूर्ण विश्वाला थक्क करणारा आहे, असा टोला त्यांनी लगावला.

महाराष्ट्राच्या प्रश्नांवर मोदीजी नेहमीच संवेदनशील राहिले आहेत. २०१५ च्या भीषण दुष्काळात मी जेव्हा त्यांच्याकडे गेलो, तेव्हा त्यांनी आमच्यासाठी विशेष 'बळीराजा योजना' मंजूर केली. यामुळेच विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील १०० प्रलंबित धरणे आपण पूर्ण करू शकलो, अशा शब्दांत त्यांनी पंतप्रधानांच्या कार्यशैलीचा गौरव केला.

## संपादकीय....

### जनसेवा

माझ्यासाठी जनता हीच देवाचे रूप आहे आणि म्हणूनच मी या सेवेकडे नेहमीच एक 'साधना' म्हणून पाहिले आहे. आपण कधीही या टप्प्यापर्यंत पोहोचू असा विचार केला नव्हता आणि सलग सर्वाधिक काळ पंतप्रधान म्हणून सेवा करण्याची संधी मिळणे हे मी माझे परम भाग्य समजतो'', असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी केले. भारताचे सर्वाधिक काळ सलग कार्यरत असणारे लोकनिर्वाचित पंतप्रधान बनण्याचा ऐतिहासिक टप्पा गाठल्यानिमित्त आयोजित एनडीए नेत्यांची बैठक पार पडली. मोदी म्हणाले, तुम्ही सर्वांनी आजचा दिवस माझ्यासाठी खरोखरच संस्मरणीय बनवला आहे. मी अत्यंत भारावून गेलो आहे आणि तुम्हा सर्वांचा मनापासून आभारी आहे. 'चरैवेती, चरैवेती' (सतत पुढे चालत राहा) या मंत्राचा जप करत आणि या राजकीय प्रवासात अनेक चढ-उतार पाहत, आपण कधी या टप्प्यापर्यंत पोहोचू असा विचारही मी केला नव्हता. भारतमातेची इतका मोठा काळ सेवा करण्याची संधी मिळणे, हे केवळ ईश्वराच्या विशेष कृपेमुळेच शक्य आहे. माझ्यासाठी जनता हीच देवाचे रूप आहे आणि म्हणूनच मी या सेवेकडे नेहमीच एक 'साधना' म्हणून पाहिले आहे. ही साधना कधीही एकाकी नव्हती; हा एक सामूहिक 'यज्ञ' आहे, ज्यामध्ये तुम्ही सर्वांनी आणि इतर अनेक सहकाऱ्यांनी कर्तव्य भावनेने आपले योगदान दिले आहे. यावेळी लोकांना गरिबीतून बाहेर काढण्यासाठी त्यांच्या सरकारने केलेल्या प्रयत्नांचाही उल्लेख पंतप्रधान मोदी यांनी केला. ते म्हणाले, माझा असा विश्वास आहे, कि जे कालपर्यंत गरीब होते आणि आता 'नव-मध्यमवर्ग' बनले आहेत, त्यांना आपण पुन्हा मागे पडू देता कामा नये. म्हणूनच, सरकार आणि लोकप्रतिनिधी म्हणून आपण दिवस-रात्र काम केले पाहिजे. १४० कोटी जनतेने आपल्यावर ठेवलेल्या विश्वासाला आणि अपेक्षांना पूर्ण करण्याच्या संकल्पाने आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. आपल्याला भारतातील तरुण, महिला, मध्यम वर्ग आणि शेतकऱ्यांच्या आकांक्षा पूर्ण करायच्या आहेत. दरम्यान, केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी एक ठराव मंजूर केला. यामध्ये देशातील सर्वाधिक काळ सेवा करणारे निर्वाचित पंतप्रधान बनल्याबद्दल पंतप्रधान मोदींचे कौतुक करण्यात आले असून, हा दिवस भारतीय लोकशाहीच्या प्रवासातील एक ऐतिहासिक टप्पा असल्याचे म्हटले आहे. ४,३९९ दिवस सलग निर्वाचित पंतप्रधान म्हणून सेवा करण्याचा विक्रम प्रस्थापित करत त्यांनी भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचा विक्रम मागे टाकला आहे. नेहरू यांनी १९५२ ते १९६४ या काळात सलग ४,३९८ दिवस निर्वाचित पंतप्रधान म्हणून सेवा केली होती. या ठरावात नमूद करण्यात आले आहे की, हा प्रसंग भारताची लोकशाही जाणीव, जनविश्वास आणि लोकसहभागाच्या शक्तीचे प्रतीक आहे, जे 'राष्ट्र प्रथम' या संकल्पाने प्रेरित असलेल्या नेत्याला जनतेने दिलेल्या अभूतपूर्व पाठिंब्याचे दर्शन घडवते.

# ज्येष्ठ नागरिकाला बेदम मारहाण; उपमुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर ३०७ कलमांतर्गत गुन्हा दाखल

ठाणे : ठाण्यातील ज्युपिटर हॉस्पिटल परिसरामध्ये एका ज्येष्ठ नागरिकाला झालेली अमानुष मारहाण सध्या संपूर्ण ठाणे शहरात चर्चेचा विषय ठरली आहे. रस्त्यावर थुंकण्यास मज्जाव केल्याच्या रागातून एका ओला कॅब चालकाने या ज्येष्ठ नागरिकाला मारहाण करून गंभीर जखमी केले. या घटनेची गंभीर दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी थेट ठाणे पोलीस आयुक्तांना या आरोपीवर हत्येच्या प्रयत्नाचा (कलम ३०७) गुन्हा दाखल करण्याचे कडक आदेश दिले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी संध्याकाळी एक ज्येष्ठ नागरिक आपल्या पत्नीसोबत ज्युपिटर हॉस्पिटलसमोरील पदपथावरून जात होते. दरम्यान, तेथून जाणारा ओला कॅब चालक निशांत धर शुक्ला (वय ४०) याने भररस्त्यात थुंकले. हे कृत्य पाहून त्या ज्येष्ठ नागरिकाने चालकाला हटकले आणि असे अस्वच्छ कृत्य करू नका, अशी समज दिली.

यावरून संतापलेल्या चालकाने गाडीतून खाली उतरून त्या वृद्ध व्यक्तीशी वाद घालण्यास सुरुवात केली. वादाचे रूपांतर धक्काबुक्कीत झाले आणि चालकाने त्या ज्येष्ठ नागरिकाला जमिनीवर पाडून बेदम मारहाण केली.

या घटनेत त्या वृद्ध नागरिकाचा पाय फ्रॅक्चर झाला असून त्यांना गंभीर दुखापत झाली आहे. आरोपीने त्यांना मारण्यासाठी हातात दगड उचलल्याचेही समोर आले आहे.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्याशी व्हिडिओ कॉलद्वारे संपर्क साधला. अशा प्रकारची मुजोरी खपवून घेतली जाणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी आरोपीवर भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०७ (हत्येचा प्रयत्न) नुसार गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले.

सध्या वर्तकनगर पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, या घटनेमुळे ठाणेकरांमध्ये सुरक्षिततेच्या प्रश्नावरून चिंता व्यक्त केली जात आहे.

# वंदे मातरमच्या इतिहासावर पत्रकार सिध्दाराम पाटील यांचे रविवारी व्याख्यान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी :- देशाच्या स्वातंत्र्यासाठी महत्वाचे गीत ठरलेल्या वंदे मातरमचा लपलेला इतिहास आणि काही महत्वाच्या घटनाबाबत पत्रकार सिध्दाराम पाटील यांचे व्याख्यान रविवार दि. १४ जून रोजी सायंकाळी ६ वाजता लोकमान्य टिळक सभागृह ॲम्फी थिएटर मध्ये होणार असल्याची माहिती महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरचे अध्यक्ष रेणुका महागावकर आणि कार्याध्यक्ष प्रशांत बडवे यांनी दिली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सोलापूर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार राहणार आहेत. नुकतेच राज्यस्तरीय वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम राबवणारी शाखा म्हणून पुण्यात महाराष्ट्र साहित्य परिषदेने दक्षिण सोलापूर शाखेला पुरस्काराने गौरवलेले आहे. त्यानंतर हा राष्ट्रप्रेमावरील वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मातृभूमीला आईचा दर्जा देवून तिची पूजा करण्याची भावना व्यक्त करणार्या वंदे मातरमचा इतिहास मोठा रंजक आहे. प्रखर राष्ट्रभक्त बंकिम चंद्र चॅटर्जी यांनी १८७० मध्ये बंगाली भाषेत वंदे मातरम कविता लिहली. त्यानंतर आनंदमठ या कादंबरीमध्ये त्याचा समावेश केला.



थोर स्वातंत्र्य सेनानी कवी रविंद्रनाथ टागोर यांनी १८९६ रोजी झालेल्या भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसच्या अधिवेशनात सर्वप्रथम ही वंदेमातरम कविता सादर केली तेव्हापासून स्वातंत्र्य लढ्याची प्रेरणा ठरलेल्या वंदेमारतने देशात क्रांती केली आणि देश स्वातंत्र्य होण्यासाठी वंदे मातरम या गीताची प्रेरणा ठरली. नुकतेच वंदे मातरम या गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाले. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्या नंतर भारताचे राष्ट्रीय गीत ठरलेल्या या वंदे मातरमचा लपलेला इतिहास काय आहे. याबाबत पत्रकार आणि युवा अभ्यासक सिध्दाराम पाटील आपल्या व्याख्यानातून माहिती देणार आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या माध्यमातून समाजप्रबोधन आणि जनजागृतीसाठी अनेक उपक्रम राबवण्यात येतात त्यातूनच या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन रविवार दि. १४ जून रोजी सायंकाळी ६ वाजता लोकमान्य टिळक सभागृह ॲम्फी थिएटर मध्ये केले आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार असणार आहेत. या आपल्या देशाच्या राष्ट्रीय गीताचा इतिहास जाणून घेण्यासाठी नव्या पिढीने कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

# खासदार प्रणिती शिंदे यांचा जनतेच्या प्रश्नासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा, शेतकरी घरकुल पुनर्वसन आणि ग्रामीण विकासाच्या विविध मागण्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी - सोलापूर लोकसभा मतदारसंघातील शेतकरी ग्रामीण नागरिक घरकुल लाभार्थी व भाविक आणि सर्वसामान्य जनतेच्या विविध प्रश्नासाठी खासदार प्रणिती शिंदे यांनी शेतकरी व ग्रामस्थांच्या शिष्टमंडळासह जिल्हाधिकारी कार्यालय भेट देऊन मा. जिल्हाधिकारी कीर्तीकियन यांना विविध विषयावरील निवेदन सादर केले. संबंधित प्रश्नांवर तातडीने कारवाई करून लवकरात लवकर योग्य निर्णय घ्यावे अशी त्यांनी मागणी केली आहे.



तसेच पंढरपूर तालुक्यातील राजनी येथील गट क्रमांक ३८० व ४८४ या गायरान जमिनी बाबत ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारीची चौकशी करून संबंधित ग्रामस्थांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्याकडे केली आहे.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावरही त्यांनी आवाज उठवत गोकुळ शुगर कारखाने कडील थकीत उजविले पंधरा दिवसाच्या आदा करण्यासाठी तातडीत हस्तक्षेप घ्यावा अशी ही मागणी केली आहे. शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे त्यांना कष्टाचे पैसे वेळेत मिळणे व त्यांचा हक्क असल्याची त्यांनी स्पष्ट केले

ग्रामीण भागातील पायाभूत सुविधासाठी. कशासाठी जिल्ह्यातील विविध गावांमध्ये घोड्यांवर पूल बांधण्यासाठी सर्वेक्षण करून आवश्यक प्रस्ताव तयार करावे अशी मागणी ही त्यांनी केली आहे व पावसाळ्यात अनेक गावांचा संपर्क तुटत असल्याने विद्यार्थी व महिला शेतकरी आणि रुग्णांना मोठ्या प्रमाणात अडचणीला सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी नमूद केले.

अक्कलकोट तालुक्यातील आदेवाडी हे गाव भीमा नदीच्या बॅकवॉटरमुळे दरवर्षी गंभीर समस्या सामोरे जात असल्याने गावच्या पुनर्वसनासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी खासदार प्रणिती शिंदे यांनी केली आहे.

धार्मिक पर्यटन स्थळ आणि स्थानिक विकासाच्या दृष्टीने मोहोळ तालुक्यातील वाळूज देगाव येथील श्री नागनाथ मंदिरास तीर्थक्षेत्र ब दर्जा मंजूर करावा अशी मागणी ही त्यांनी केली आहे या निर्णयामुळे मंदिर परिसरातील विकासाला गती मिळून भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होण्यास मदत होईल असेही त्यांनी म्हटले आहे.

तसेच पंढरपूर तालुक्यातील तारापूर येथील प्रधानमंत्री आवास योजना व ग्रामीण अंतर्गत मंजूर लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी आवश्यक वाळू उपलब्ध करून घ्यावी अशी मागणी करण्यात आले वाळू अभावी अनेक लाभार्थींची घरी अपूर्ण राहिल्याचे त्यांनी

पंढरपूर तालुक्यातील पोहरगाव येथील रेशन दुकानदार विस्टांक उपलब्ध असूनही लाभार्थ्यांना धान्य मिळत नसलेल्या तक्रारीवरून त्याची चौकशी करून पात्र रेशन धारकांना त्यांना धान्य उपलब्ध करून देण्यात यावी अशी मागणी जिल्हा पुरवठा अधिकारी कडे करण्यात आली आहे.

यावेळी माननीय जिल्हाधिकारी एस. कीर्तीकियन यांनी सर्व निवेदनांची सकारात्मक दखल घेत संबंधित विभागाकडून वस्तुनिष्ठ पडताळणी करून योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील तसेच प्रलंबित प्रश्नावर सकारात्मक निर्णय घेण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असेही आश्वासन दिले. खासदार प्रणिती शिंदे यांनी सादर केलेल्या या विविध निवेदना मधून शेतकरी ग्रामीण नागरिक घरकुल लाभार्थी रेशन कार्डधारक आणि ग्रामस्थांच्या प्रश्नाबाबत यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा करत असल्याचे दिसून येत असून संबंधित विभागणी या मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने सहकार्य करावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त करण्यात येत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांच्याकडून मतदानाच्या पहिल्या टप्प्याचे प्रशिक्षण

## महाराष्ट्र विधानपरिषद स्थानिक प्राधिकार मतदार संघ द्विवार्षिक निवडणूक २०२६







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : महाराष्ट्र विधानपरिषद स्थानिक प्राधिकारी मतदार संघाच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी मतदान प्रक्रियेच्या प्राथमिक टप्प्यातील प्रशिक्षण पूर्ण झाले. या प्रशिक्षणास जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी एस. कार्तिकेयन, उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुशांत बनसोडे, निवडणूक निरीक्षक श्रवण हार्डीकर तसेच सर्व तहसीलदार अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख यांनी मतदान प्रक्रियेची संपूर्ण माहिती दिली. या निवडणुकीसाठी ६ मतदान केंद्रे, २ उमेदवार आणि एकूण ६१६ मतदार निश्चित करण्यात आले आहेत. निवडणूक जाहीर व आचारसंहिता दिनांक १८ मे २०२६ रोजी लागू झाली असून मतदान दिनांक १८ जून २०२६ सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत होईल. मतमोजणी २२ जून २०२६ रोजी पार पडणार आहे.मतदान केंद्रांवर मतदारांची यादी पुरविण्यात येणार असून अधिकारी व कर्मचारी यांनी ती नीट तपासून खात्री करावी. नगरपंचायत व नगरपरिषद केंद्रांवर मतदारांची ओळख पटविण्यासाठी गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी व संबंधित अधिकारी उपस्थित राहतील.

मतदान अधिकारी नियुक्ती :क्षेत्रीय अधिकारी – उपजिल्हाधिकारी मतदान केंद्राध्यक्ष – तहसिलदारमतदान अधिकारी क्र.१ – नायब तहसिलदारमतदान अधिकारी क्र.२ – अव्वल कारकूनमतदान अधिकारी क्र.३ – अव्वल कारकून/लिपिकमतदान कर्मचारी – शिपाईस्थानिक स्वराज संस्थेचे मुख्याधिकारी व गटविकास अधिकारी यांची मतदार ओळख पटविण्यासाठी नेमणूक करण्यात आली आहे.

मतदान पद्धत : मतदारांना उमेदवाराच्या नावासमोर पसंतीक्रम अंकात लिहावा लागेल. हा क्रमांक मराठी, इंग्रजी, रोमन किंवा भारतीय भाषांतील अंकात लिहिता येईल, परंतु शब्दात लिहिता येणार नाही. भारत निवडणूक आयोगाने पुरविलेला जांभळा स्केचपेन वापरूनच मतदान करावे. प्रत्येक मतपत्रिकेला काउंटर फाईल असेल ज्यावर मतदार यादी भाग क्रमांक, अनुक्रमांक व मतदाराची स्वाक्षरी/अंगठा नोंदविला जाईल.

निवडणूक साहित्य वितरण : दिनांक १७ जून २०२६ रोजी सकाळी ९ वाजता बहुद्देशीय सभागृह, जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथे साहित्य वितरण होईल. मतदान केंद्राध्यक्षांनी मतपेटी, मतपत्रिका, स्केचपेन, सील, टॅग, मतदार यादी इत्यादी साहित्याची काळजीपूर्वक तपासणी करावी.

मतदान केंद्रावरील दक्षता : मतदान केंद्रावर १०० मीटर परिसरात सुरक्षा यंत्रणा राबविण्यात येईल. मतदान पथक व प्रतिनिधींनी गोपनीयतेची शपथ घ्यावी. मतदान केंद्रात मोबाईल, स्मार्टवॉच यांसारखी उपकरणे नेण्यास बंदी असेल. मतदाराने मतपत्रिका दाखविल्यास ती रद्द केली जाईल.

यावेळी निवडणूक निरीक्षक श्रावण हर्डीकर यांनी मतदान केंद्रांवर दबाव आणण्याचे प्रकार घडू शकतात, त्यामुळे सर्व पथकांनी सतर्क राहावे, असे निर्देश दिले. मतदान प्रक्रियेत गोपनीयता राखणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी निवडणूक यशस्वीपणे पार पाडण्यासाठी बारकाईने लक्ष ठेवण्याचे आवाहन केले. मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असून त्यांचा योग्य वापर करावा, असेही त्यांनी सांगितले.

# गांधींच्या सेवाग्राम आश्रमात तीन दिवसीय नशाबंदी मंडळाच्या संघटकांची संवाद, समन्वय व वार्षिक नियोजन बैठक संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी /एस.के.गायकवाड : नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्यच्या महाराष्ट्रातील ३६ जिल्हा संघटकाचे संवाद, समन्वय आणि वार्षिक नियोजन बैठकीचे आयोजन शुक्रवार ५ जून ते ७ जून पर्यंत यात्री निवास, सेवाग्राम आश्रम,जिल्हा वर्धा याठिकाणी आयोजित करण्यात आली. या ठिकाणी संघटकाना २०२६-२७ ची मान्यता तसेच वर्षभरात संघटकांच्या कार्याचे नियोजन करण्यात आले. संघटकांना साहित्यात पोस्टर, पत्रक, महामानवाने विचारांचे पुस्तक, व्यसनमुक्ती वरील सापशिडी देण्यात आली. यावेळी संघटक बैठकीचे उद्घाटन कल्याणयात्रा व वार्षिक कार्य अहवालच्या प्रदर्शनीचे नशाबंदी मंडळाचे अध्यक्ष माजी मुंबई विद्यापीठ कुलगुरू डॉ. राजन वेळूकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी नशाबंदी मंडळाच्या सरचिटणीस वर्षा विद्या विलास, मुख्य संघटक/ चिटणीस अमोल मडामे, चिटणीस चंद्रकांत चौधरी, सदस्य बॉस्को डिसुझा, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कक्ष वर्धा चे डॉ. नितिका व त्याची टिम हे उपस्थित होते. यावेळी ३६ जिल्ह्यातील संघटक, ६ विभाग प्रमुख, नशाबंदी मंडळाचे कार्यालय कर्मचारी उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. राजन वेळूकर यांनी संस्था चालवतांना कशा पद्धतीने फंड गोळा केला पाहिजे त्यासाठी संस्थेचे प्रेझेंटेशन कसे असावे यावर मार्गदर्शन केले. तसेच नशाबंदी मंडळाच्या जिल्हा संघटक यांचे कौतुक केले त्यांना सूर्याची उपमा दिली. मंडळाला पुढील कार्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

सदर कार्यक्रमाची प्रस्तावना नशाबंदी मंडळाचे मुख्य संघटक व चिटणीस अमोल स. भा. मडामे यांनी केले, वर्षभरात आपल्या जिल्ह्यात विशेष कार्यकेल्याबद्दल सिंधुदुर्ग जिल्हा संघटक अर्पिता मुंबरकर यांना गोल्डन मेडल देऊन तर नागपूर जिल्हा संघटक गौरव आळणे यांना सिल्वर मेडल तर पालघर जिल्हा संघटक मिलिंद पाटील यांना ब्रान्स मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी विभागीय संघटक प्रमुख म्हणून उत्तम काम केल्याबद्दल प्रथम क्रमांक पुणे विभाग प्रमुख अ‍ॅड. सुरेश संकटे व यांची टिम यांना सन्मानचिन्ह व रोख रक्कम तीन हजार रूपये तर दुसरा क्रमांक कोकण विभाग प्रमुख दिशा कळंबे व यांची टिम यांना सन्मानचिन्ह व रोख रक्कम दोन हजार रूपये देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. राजन वेळूकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. त्यानंतर नशाबंदी मंडळाचे ३६ संघटकानी आपला परिचय देऊन विभाग प्रमुखांची निवड करण्यात आले. तसेच अहवाल लेखन, ऑनलाइन बैठकीविषयी सूचना तसेच कल्याण यात्रा विषयी सूचना मुख्य संघटक यांनी दिल्या. संघटकांना व्यसनमुक्तीची किती माहिती आहे? हे जाणून घेण्यासाठी बोल बच्चन हा खेळ सरचिटणीस यांनी घेतला.

**नशाबंदी मंडळ धाराशिव जिल्हा संघटक म्हणून मारुती बनसोडे यांची नियुक्ती**

दुसऱ्या दिवशी ६ जून रोजी रॅली कॉल ने दिवसाची सुरुवात झाली. त्यानंतर ३६ संघटकानी आपल्या जिल्ह्यांची ऐतिहासिक ओळख, व्यसनमुक्ती केंद्र, शाळा, कॉलेज, आश्रमशाळा, वसतिगृहे किती आहेत सांगुन जिल्ह्याचा परिचय देण्यास सांगण्यात आले. तसेच विभागानुसार बसून जिल्हा संघटक यांचे वार्षिक कार्यक्रम नियोजन करण्यात आले. त्याचबरोबर प्रत्येक जिल्ह्यात किमान ३ शाळा व ३ कॉलेज तंबाखूमुक्त करण्याचा व प्रत्येक जिल्ह्यात ड्रग्स फ्री जिल्हा अभियान राबवून नशा मुक्त भारत अभियानास अधिक बळ देण्याचा संकल्प करण्यात आला. संध्याकाळी सेवाग्राम आश्रम भेट व सर्व धर्म प्रार्थना मध्ये सहभाग घेतला रात्री संघटक यांनी पथनाट्य सादरीकरण करण्यात आले. तिसऱ्या दिवशी म्हणजेच ७ जून रोजी, सकाळी नशाबंदी मंडळाचे कार्यकारी सदस्य बॉस्को डिसुझा यांनी नवीन अंमली पदार्थांची ओळख! या विषयावर मार्गदर्शन केले. तर नशाबंदी मंडळाचे कार्यकारी सदस्य सुजाता सावंत यांनी जिल्ह्यात फंड कशाप्रकारे उभा करता येईल या वर मार्गदर्शन केले. बैठक समारोप प्रसंगी जिल्हा परिषद वर्धा चे जिल्हा समाजकल्याण विभागाचे निरीक्षक राज मरापे यांनी भेट देऊन संघटकाचे कौतुक केले व सदिच्छा दिल्या. त्यांच्या हस्ते प्रत्येक संघटकांना सहभाग प्रमाणपत्र देऊन शिबिराचा समारोप झाला. या तीन दिवसीय बैठकीतधाराशिव जिल्हा संघटक म्हणून मारुती बनसोडे यांची नियुक्ती करण्यात आली. *याप्रसंगी मारुती बनसोडे यांनी जिल्ह्यात व्यसनमुक्तीचे कार्य अधिक जोमात होण्याकरता स्वतः प्रयत्नशील राहून तसेच प्रशासनाची मदत घेऊन, जनसामान्या सहभागी करून घेऊन व्यसनमुक्त धाराशिव जिल्हा निर्माण करण्याचा संकल्प केला.

# यंदा पावसाळा कमी? शेतकऱ्यांची चिंता वाढली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी : यंदा मान्सूनच्या आगमनास विलंब होत असून अपेक्षित प्रमाणात पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. जून महिना सुरू होऊनही अनेक भागांत समाधानकारक पाऊस झाला नसल्याने खरीप हंगामाच्या तयारीवर परिणाम होत आहे.

शेतकऱ्यांनी पेरणीसाठी शेतांची मशागत करून बियाणे व खतांची खरेदी केली आहे. मात्र पावसाने अद्याप हजेरी लावली नसल्याने पेरणीची कामे रखडली आहेत. पाऊस वेळेत न झाल्यास उत्पादनावर परिणाम होण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.

परिसरातील विहिरी, बोअरवेल आणि पाणीसाठ्यांची पातळीही कमी होत असून जनावरांच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. हवामान खात्याच्या अंदाजाकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

पाऊस लवकर सुरू झाला नाही तर खरीप हंगाम धोक्यात येईल, अशी प्रतिक्रिया अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली. सध्या शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसले असून लवकरात लवकर चांगला पाऊस पडावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# राज्यातील स्वातंत्र्य सैनिक सन्मान निवृत्तीवेतन पेन्शनधारकांना आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.-४४/स्वासैक-१, दिनांक २६ मे २०२६ अन्वये राज्यातील स्वातंत्र्य सैनिक सन्मान निवृत्तीवेतन योजना डीबीटी (उ्ह्ढ) पोर्टलवर समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यानुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिक सन्मान निवृत्तीवेतनधारक स्वातंत्र्य सैनिक तसेच स्वातंत्र्य सैनिक हयात नसल्यास सन्मान निवृत्तीवेतन प्राप्त करणाऱ्या वारसपत्नी यांची अद्ययावत माहिती शासनास सादर करावयाची आहे.

तरी संबंधित लाभार्थ्यांनी खालील कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित छायांकित प्रती संबंधित तहसील कार्यालय / तलाठी कार्यालयाकडे दोन दिवसांच्या आत जमा कराव्यात,

आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक पासबुक, पी.पी.ओ. आदेश असल्यास त्याची प्रत.

सदर माहिती तलाठी व कार्यालयीन कर्मचाऱ्यांमार्फत गृहभेटीद्वारे संकलित करण्यात येत आहे. ज्या स्वातंत्रसैनिक पेन्शनधारकांनी आवश्यक कागदपत्रांसहची माहिती अद्याप दिली नाही, त्यांनी संबंधित तहसील कार्यालय अथवा तलाठी कार्यालयाशी तात्काळ संपर्क साधावा. विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यास लाभार्थ्यांची माहिती डीबीटी पोर्टलवर अद्ययावत करता येणार नाही व निवृत्तीवेतन जमा होण्यास अडचण निर्माण होऊ शकते.

अधिक माहितीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर (स्वातंत्र्य सैनिक शाखा) दूरध्वनीक्र.०२१७-२७३१०२० येथे संपर्क साधावा असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

**मोर्चाद्वारे शासनाकडे केली मागणी**

**शेतकऱ्यांना सध्या लोडशेडींगचा फटका बसत असल्याने हजारो हेक्टर क्षेत्रावर असलेली पिके धोक्यात**

# करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांना इंदापूर तालुक्याप्रमाणे शेतीपंपासाठी आठ तास वीज द्या : आ. नारायण आबा पाटील



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी - करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांना सध्या लोड शेडींग चा फटका बसत असल्याने हजारो हेक्टर क्षेत्रावर असलेली पिके धोक्यात आली आहेत. यामुळे शेतीपंपासाठी आठ तास वीज देण्याची मागणी आमदार नारायण आबा पाटील यांनी एका मोर्चाद्वारे शासनाकडे केली आहे महावितरण कडून होत असलेले या न्यायविरुद्ध शेतकऱ्यांनी करमाळा येथे तहसील कचेरीवर मोर्चा काढला व या मोर्चामध्ये आमदार नरेंद्र पाटील हे स्वतः सहभागी झाले होते व श्री दत्त मंदिरासमोरून या मोर्चा सुरुवात झाली व शेवट हा मोर्चा करमाळा तहसील कार्यालयावर येऊन धडकला यावेळी महावितरणच्या वार्षिक विभागाचे कार्यकारी अभियंता मगर, तहसीलदार शिल्पा ठोकडे, महावितरण जेऊर विभाग उपकार्यकारी अभियंता भोयर, करमाळा विभाग उपकार्यकारी अभियंता कलावती यांनी आमदार नारायण आबा पाटील यांना दिलेले निवेदन स्वीकारले यावेळी बोलताना आमदार पाटील म्हणाले की करमाळा तालुक्यातील शेतकरी सध्या नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक संकटात सापडला आहे एकीकडे त्यास वादळी वाऱ्यासह पावसामुळे शेतीतील पिके जमीन दोस्त झाल्याने फार मोठा फटका बसला आहे तर दुसरीकडे महावितरण कडून झालेल्या वीज कपातीमुळे हातातील पिकांना धोका निर्माण झाल्याने आणखी एक आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे.यामुळे शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी महावितरण कंपनीने सर्वांना सामान्य या तत्त्वावर करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांना सुद्धा आठ तास अखंडित पूर्ण तापाने वीज पुरवठा करावा यासाठी आजपासून अंमलबजावणी करावी असे सांगितले. प्रास्ताविक पाटील गटाची प्रवृत्ती सुनील तळेकर यांनी केले या मोर्चाची कृषिभूषण दादासाहेब पाटील, माजी उपसभापती दत्तात्रय सरडे, जिल्हा परिषद सदस्य अजित तळेकर, भाऊसाहेब गोडसे पंचायत समिती सदस्य तथा माजी सभापती अतुल पाटील स्वप्नील काळे ज्ञानेश्वर बिसिटकर यांच्यासह आदिनाथ माजी संचालक धुळा कोकरे विद्यमान संचालक डॉक्टर हरिदास केव्हा रे संचालक देवानंद बागल उपाध्यक्ष महेंद्र पाटील, संचालक रविकिरण फुके संचालक विजय नवले, दत्तात्रेय देशमुख राजाभाऊ कदम आबासाहेब आंब्रे दत्तात्रय गव्हाणे किरण कवडे संतोष पाटील रामेश्वर तळेकर श्रीमान चौधरी प्राध्यापक डॉक्टर संजय चौधरी माजी संचालक रवी भाऊ कोकरे सरपंच पृथ्वीराज पाटील प्रमोद बंदे सोमनाथ देवकते मौलाना मुलानी सरपंच विकास गलांडे माजी जिल्हा परिषदेचे किसन शिंदे भैय्यासाहेब शिंदे गहिनीनाथ दुधी सरपंच संजय गलांडे केडगावकर पाटील सरपंच अमर ठोंबरे माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रप्रकाश दराडे नाना घोडगे माजी सरपंच संदीप मार्कड विलास बैठे मकाई संचालक गोवर्धन करगळ श्री सहाय्यक संजय फडतरे आबासाहेब गायकवाड शशिकांत नरोटे आदीजण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'मेडिसिटी'द्वारे जागतिक दर्जाची आरोग्यसेवा परिसंस्था प्रत्यक्षात येणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## एकात्मिक आरोग्य सेवा परिसंस्था विकसित करण्यासाठी १.२ अब्ज अमेरिकी डॉलरच्या गुंतवणुकीची बांधिलकी

**■ राज्य शासन, क्लीव्हलँड क्लिनिक, ब्रुकफिल्ड आणि आरोधन हेल्थ सिटी यांच्यात नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी (एनएमआयएमसी) विकसित करण्यासाठी सामंजस्य करार**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

क्लीव्हलँड, ओहायो : 'मेडिसिटी' ही रुग्णसेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, नवोन्मेष आणि प्रतिभेला एका एकात्मिक केंद्रात एकत्र आणणारी जागतिक दर्जाची आरोग्य सेवा परिसंस्था उभारण्याची राज्य शासनाची संकल्पना आहे. ही संकल्पना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या 'हील इन इंडिया' या दृष्टिकोनाशी सुसंगत असून लवकरच ती प्रत्यक्षात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.







जगातील सर्वात महत्त्वाकांक्षी आरोग्य सेवा परिसंस्थांपैकी एक उभारण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल टाकत महाराष्ट्र शासन, क्लीव्हलँड क्लिनिक (सीसी), ब्रुकफिल्ड अ‍ॅसेट मॅनेजमेंट आणि आरोधन हेल्थ सिटी (एएचसी) यांनी नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटीच्या विकासासाठी सहकार्य करण्याबाबत सामंजस्य करार केला. या ऐतिहासिक प्रसंगाचे साक्षीदार म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुंबईहून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते. त्यांच्यासोबत वरिष्ठ शासकीय अधिकारी तसेच ब्रुकफिल्ड आणि एएचसीचे प्रतिनिधीही उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे यांनी क्लीव्हलँड क्लिनिकच्या मुख्यालयात महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधित्व केले. क्लीव्हलँड क्लिनिकच्या पथकाचे नेतृत्व त्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. टोमिस्लाव मिहाल्जेविक, डॉ. समीर कपाडिया (अध्यक्ष, कार्डिओव्हॅस्क्युलर मेडिसिन), डॉ. फाल्कोने (अध्यक्ष, इमर्जिंग मार्केट्स) आणि आर्सेलर मित्तलचे कार्यकारी अध्यक्ष तसेच क्लीव्हलँड क्लिनिकचे संचालक मंडळ सदस्य श्री. लक्ष्मी मित्तल यांनी केले. आरोधन हेल्थ सिटीच्या डॉ. सलोनी पटवर्धन याही क्लीव्हलँड येथे उपस्थित होत्या.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आज झालेल्या सामंजस्य करारातून ही भागीदारी भारतातील आरोग्य सेवांच्या क्षेत्रातील परिवर्तनकारी प्रवासाची सुरुवात आहे. जगातील सर्वात प्रतिष्ठित आरोग्य संस्थांपैकी एक असलेल्या क्लीव्हलँड क्लिनिकने महाराष्ट्रासोबत या उपक्रमात भागीदारी करण्याचा निर्णय घेतल्याचा आम्हाला अभिमान आहे. डॉ. मिहाल्जेविक यांच्या नेतृत्वाखालील संपूर्ण क्लीव्हलँड क्लिनिक नेतृत्वाचे तसेच विशेषतः डॉ. समीर कपाडिया आणि लक्ष्मी मित्तल यांचे या उपक्रमाला पुढे नेण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी आभार मानले.

भारताचे पहिले जागतिक स्तरावरील आरोग्य सेवा, संशोधन, वैद्यकीय शिक्षण आणि वैद्यकीय पर्यटन केंद्र म्हणून संकल्पित करण्यात आलेली नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी ही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगत सुमारे २५० एकर क्षेत्रावर विकसित केली जाणार आहे.

प्रस्तावित भागीदारीनुसार, क्लीव्हलँड क्लिनिक या प्रकल्पाची प्रमुख संस्था म्हणून कार्य करेल. अत्युच्च दर्जाची आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, नवोन्मेष आणि रुग्णकेंद्रित आरोग्य सेवा पुरविण्यातील जागतिक अनुभव या प्रकल्पासाठी उपलब्ध करून दिला जाईल. या प्रकल्पातून सुमारे १.२ अब्ज अमेरिकी डॉलरची गुंतवणूक आकर्षित होण्याची आणि १०,००० हून अधिक थेट रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

एनएमआयएमसीची संकल्पना केवळ आरोग्य सेवा पुरविण्यापुरती मर्यादित नाही. या परिसंस्थेमध्ये जागतिक दर्जाची रुग्णालये, वैद्यकीय आणि परिचारिका शिक्षण संस्था, क्लिनिकल संशोधन केंद्रे, जैवतंत्रज्ञान आणि जीवन विज्ञान सुविधा, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित आरोग्य सेवा नवोन्मेष, वेलनेस पायाभूत सुविधा आणि संबंधित आरोग्य सेवा एकाच सहयोगी कॅम्पसमध्ये विकसित करण्यात येणार आहेत. मेडिसिटीभोवती विकसित होणाऱ्या व्यापक नवोन्मेष परिसंस्थेचा भाग म्हणून, लक्ष्मी एन. मित्तल यांनी स्थापन केलेल्या एलएनएमआयआयटी, जयपूरने क्लीव्हलँड क्लिनिक आणि एनएमआयएमसीसोबत संशोधन पायाभूत सुविधा, प्रगत तंत्रज्ञान क्षमता आणि शैक्षणिक कौशल्य उपलब्ध करून अत्याधुनिक आरोग्य सेवा नवोन्मेष, ट्रान्सलेशनल रिसर्च, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि प्रिसिजन मेडिसिन उपक्रमांना पाठबळ देण्यासाठी सहकार्य करण्याची तयारी दर्शविली आहे.

क्लीव्हलँड क्लिनिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अध्यक्ष डॉ. टॉम मिहाल्जेविक म्हणाले, क्लीव्हलँड क्लिनिक जगभरातील धोरणात्मक भागीदारीद्वारे रुग्णसेवा, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात प्रगती साधण्यासाठी कटिबद्ध आहे. एनएमआयएमसी हा भविष्यातील रुग्ण, आरोग्य व्यावसायिक आणि संशोधकांच्या गरजा पूर्ण करणाऱ्या दूरदर्शी आरोग्य परिसंस्थेत आमचे कौशल्य योगदान देण्याची संधी आहे. महाराष्ट्र शासन, ब्रुकफिल्ड आणि आरोधन हेल्थ सिटी यांच्यासोबत भारतात क्लिनिकल उत्कृष्टता, नवोन्मेष आणि शिक्षणासाठी जागतिक दर्जाचे व्यासपीठ उभारण्यासाठी सहकार्य करताना आम्हाला आनंद होत आहे.

ब्रुकफिल्डचे व्यवस्थापकीय भागीदार आणि आशिया पॅसिफिक विभागाचे रिअल इस्टेट प्रमुख अंकुर गुप्ता म्हणाले, नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी ही मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि सामाजिक परिणाम घडवून आणणारी पायाभूत सुविधा उभारण्याची एक अद्वितीय संधी आहे. महाराष्ट्र शासन, क्लीव्हलँड क्लिनिक आणि आरोधन हेल्थ सिटी यांच्यासोबत भविष्यातील अनेक पिढ्यांना लाभदायी ठरणारे जागतिक दर्जाचे आरोग्य सेवा केंद्र उभारण्याचा आम्हाला अभिमान आहे.

आरोधन हेल्थ सिटीच्या संस्थापक आणि संचालक डॉ. सलोनी पटवर्धन म्हणाल्या, जगातील सर्वोत्तम संस्थांना एकत्र आणून एकात्मिक आरोग्य सेवा परिसंस्था निर्माण करणे हा आमचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. आजचा हा टप्पा आम्हाला त्या ध्येयाच्या आणखी जवळ घेऊन गेला असून नवी मुंबईमध्ये जागतिक आरोग्य सेवा केंद्र स्थापन करण्याच्या दिशेने मोठे पाऊल आहे.

महाराष्ट्र शासन या भागीदारीसाठी आवश्यक सहकार्य करेल तसेच लागू असलेल्या धोरणे आणि नियमांनुसार आवश्यक मंजुरी आणि परवानग्या मिळविण्यासाठी या समूहाला मदत करेल.

**नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी विषयी**

नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी हा महाराष्ट्र शासन विकसित करत असलेला एक परिवर्तनकारी आरोग्य आणि जीवन विज्ञान उपक्रम आहे. भारतातील सर्वात मोठ्या एकात्मिक आरोग्य सेवा परिसंस्थांपैकी एक म्हणून विकसित होणारा हा प्रकल्प नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगत उभारला जाणार आहे. जागतिक दर्जाचे आरोग्य सेवा प्रदाते, संशोधक, शिक्षक, नवोन्मेषक आणि गुंतवणूकदार यांना एकत्र आणून क्लिनिकल उत्कृष्टता, संशोधन, नवोन्मेष आणि वैद्यकीय शिक्षणावर आधारित जागतिक स्तरावरील स्पर्धात्मक आरोग्य सेवा केंद्र निर्माण करणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे.

# बोगस खते व बियाणे विक्रेत्यांवर कठोर कारवाई करा; मराठा सेवा संघाची कळंब कृषी अधिकाऱ्यांकडे मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब /प्रतिनिधी :- कळंब शहर व परिसरातील काही कृषी सेवा केंद्रे आणि ग्रो एजन्सीजमार्फत शेतकऱ्यांना निकृष्ट दर्जाचे, बोगस व गुणवत्तेचे निकष पूर्ण न करणारे खत आणि बियाणे विकले जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर, अशा बोगस विक्रेत्यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी आणि त्यांचे परवाने रद्द करावेत, अशी आग्रही मागणी मराठा सेवा संघ, कळंबच्या वतीने तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

मराठा सेवा संघाने दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, निकृष्ट दर्जाच्या बियाणे व खतांमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून पिकांचे अपेक्षित उत्पादन मिळत नाही. यामुळे आधीच संकटात असलेला शेतकरी वर्ग मानसिक त्रास व नैराश्याचा सामना करत असून कर्जबाजारी होत आहे. गतवर्षी घेतलेले काही बियाण्यांचे सॅम्पल बोगस असल्याचे निष्पन्न झाले होते, तरीदेखील अशी उत्पादने बाजारात खुलेआम विकली जात असल्याचा खळबळजनक आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

**विशेष मोहीम राबवून तपासणी करण्याची मागणी**

मराठा सेवा संघाने प्रशासनाकडे खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत:

कळंब शहरातील सर्व खत, बियाणे व कृषी निविष्ठा विक्री केंद्रांची विशेष मोहीम राबवून तातडीने तपासणी करण्यात यावी.

संबंधित दुकानांमधील खत व बियाण्यांचे नमुने घेऊन ते तातडीने अधिकृत प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावेत.

दुकानदारांकडे असणारे विक्री परवाने, साठा नोंदी, बिल पुस्तके आणि उत्पादनांची गुणवत्ता प्रमाणपत्रे यांची कडक पडताळणी व्हावी.

नियम डावलून दुकानांसमोर साठ्याची माहिती उपलब्ध न ठेवणाऱ्या केंद्रांवर कारवाई व्हावी.

**दोषींवर परवाने रद्द करण्याची कारवाई करा!**

तपासणीत जे विक्रेते दोषी आढळतील, त्यांच्यावर संबंधित कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या अशा बोगस विक्रेत्यांचे परवाने कायमचे रद्द करण्यात यावेत, जेणेकरून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान टळेल, अशी मागणी मराठा सेवा संघाच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.




या निवेदनाच्या प्रती मा. तहसीलदार (कळंब) आणि मा. जिल्हा कृषी अधीक्षक (धाराशिव) यांनाही पाठवण्यात आल्या आहेत. निवेदन देतेवेळी मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष शिवश्री प्रा. जगदीश गवळी, कार्याध्यक्ष शिवश्री डॉ. अनिल फाटक, सचिव शिवश्री अरविंद शिंदे, संघटक शिवश्री संदिप शेंडगे सर यांच्यासह अमोल आण्णा शेळके,शिवश्री अतुल गायकवाड, ॲड अशोक चोंदे,युवराज बनसोडे, ज्ञानेश्वर कुटे, विकास शिंदे, शरद मुळीक आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या सूचना**

**सर्व नोडल अधिकारी यांच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी यांचे मार्गदर्शन**

# सर्व नोडल अधिकाऱ्यांनी दिलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) :- महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या सर्व नोडल अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी. व ही निवडणूक अत्यंत शांततामय वातावरणात व यशस्वीपणे पार पाडावी असे आवाहन जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित विधान परिषद निवडणूक स्थानिक प्राधिकरण मतदार संघ बाबत नियुक्त सर्व नोडल अधिकारी यांच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कार्तिकेयन मार्गदर्शन करत होते. यावेळी निवडणूक निरीक्षक श्रवण हार्डीकर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय कबाडे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उप जिल्हा निवडणूक अधिकारी सुशांत बनसोडे, उप जिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, समाज कल्याण सहायक आयुक्त सुलोचना सोनवणे, अन्य धान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांच्या सह अन्य नोडल अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तीकेयन म्हणाले की, या निवडणुकीसाठी प्रत्येक उपविभागीय अधिकारी स्तरावर मतदान केंद्र असणार आहेत. या सहा ठिकाणचे वेब कास्टिंग करण्यात येऊन त्याचा नियंत्रण कक्ष जिल्हाधिकारी कार्यालयात करावा. मतदान व मतमोजणी साठी आवश्यक असलेले साहित्य तयार ठेवावे. एफएसटी, व्हीएसटी व एसएसटी या टीमची स्थापना करून त्या अत्यंत कार्यक्षमपणे काम करतील यासाठी नियोजन करावे. सूक्ष्म निरीक्षक यांची नियुक्ती करून त्यांना प्रशिक्षण द्यावे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात कॉल सेंटर तयार करून ते ॲक्टिव्ह पणे काम करेल हे पहावे. त्याप्रमाणेच निवडणूक कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे घ्यावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

पोलीस विभागाने ज्यांच्याकडे शस्त्रे आहेत त्या जमा करण्याची कारवाई तात्काळ पूर्ण करावी. निवडणुकीच्या अनुषंगाने चेक पोस्टवर तपासणी मोहीम अत्यंत बारकाईने राबवावी. मतमोजणी झाल्यानंतर मत पेट्या ठेवण्यासाठीची स्ट्राँग रूम तयार करावी. मतदान केंद्रावर आरोग्य पथके नियुक्त करावीत. तसेच सर्व संबंधित नोडल अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर सोपवण्यात आलेले जबाबदारी परस्परात योग्य समन्वय ठेवून पार पाडावी अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिल्या.

**सर्व मतदारांना त्यांचे मतदान कोणत्या मतदान केंद्रावर आहे याची माहिती द्यावी : निवडणूक निरीक्षक श्रवण हार्डीकर**

महाराष्ट्र विधान परिषद सोलापूर स्थानिक मतदार संघ निवडणुकीसाठी एकूण ६१६ मतदार आहेत. तसेच १८ जून रोजी जिल्ह्यातील सहा मतदान केंद्रावर यासाठी मतदान प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. तरी निवडणूक विभागाने सर्व मतदारांना त्यांचे मतदान कोणत्या मतदान केंद्रावर होणार आहे याची माहिती द्यावी. तसेच राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींनाही मतदाराचे मतदान कोणत्या मतदार केंद्रावर आहे याविषयी कळवावे, एकूण मतदारांपैकी कोणी मयत आहेत का याचीही खात्री करावी, अशा सूचना निवडणूक निरीक्षक श्रवण हार्डीकर यांनी दिल्या. श्री हार्डीकर पुढे म्हणाले की, पोलीस विभागांने मतदारांना कोणतेही प्रलोभन अथवा जबरदस्ती या अनुषंगाने तक्रारी आल्यास त्यावर तात्काळ कार्यवाही करावी, असे सांगितले. मतदान केंद्राची सुरक्षा, स्ट्राँग रूमची सुरक्षा व मतदान प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आवश्यक तो बंदोबस्त पोलीस विभागाने ठेवावा. असे त्यांनी सूचित केले.

प्रारंभिक निवासी उप जिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी विधान परिषद निवडणूक सोलापूर स्थानिक प्राधिकरण मतदारसंघासाठी २८ नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती देऊन प्रत्येकावर सोपवण्यात आलेल्या जबाबदारी विषयी त्यांनी माहिती दिली. तसेच यावेळी सर्व नोडल अधिकाऱ्यांनी आतापर्यंत केलेल्या कामकाजाची माहिती बैठकीत सांगितली.